# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:30.10.2025** **वार:गुरुवार**

---

१. सागरी क्षेत्र भारताच्या विकासाला चालना देत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

२. भारतातल्या सायबर सुरक्षा प्रणालीनं नवी उंची गाठल्याचा भारतीय संगणक आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक डॉ. संजय बहल यांचा विश्वास

३. बिहार विधानसभा निवडणूक प्रचाराला वेग

आणि

४. मोंथा चक्रीवादळानंतर तेलंगणच्या अनेक भागांत काल जोरदार पाऊस, मुंबईत होणाऱ्या महिला क्रिकेट सामन्यावरही पावसाचं सावट

**<u>सागरी सप्ताह मोदी</u>**

सागरी क्षेत्र भारताच्या विकासाला चालना देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारत समुद्री सप्ताह २०२५ या जागतिक सागरी परिषदेमध्ये ते काल मुंबईत बोलत होते. गेल्या दशकात सागरी क्षेत्रात लक्षणीय बदल झाले आहेत. भारताचं सागरी क्षेत्र वेगानं आणि उर्जेनं प्रगती करत असून आज भारताची बंदरं विकसनशील जगात सर्वात कार्यक्षम म्हणून गणली जातात, असं पंतप्रधान म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी सुरक्षेबाबतच्या दूरदृष्टीची प्रशंसा करताना पंतप्रधान म्हणाले,

पंतप्रधान बाईट

सरकारनं ब्रिटीशकालीन जहाजबांधणी कायद्यांमध्ये सुधारणा केली असून त्यांची जागा आता आधुनिक, भविष्यकालीन कायद्यांनी घेतली आहे असं सांगून या क्षेत्रात भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या परिषदेला उपस्थित होते. ही परिषद या क्षेत्रातील बदलांबाबतच्या आदानप्रदानासाठी महत्त्वाचा, उपयुक्त मंच ठरल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

एमवायजेएस

केंद्र सरकारच्या मॉडेल युथ ग्राम सभा उपक्रमाचं उद्घाटन आज नवी दिल्लीत होणार आहे. पंचायत राज मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयानं हा उपक्रम सुरू केला आहे. देशभरातल्या

एक हजारांहून अधिक शाळांमध्ये हा उपक्रम राबवणार असल्याची माहिती पंचायत राज मंत्रालयानं दिली आहे.

**निवडणूक आयोग हेल्पलाईन**

नागरिकांच्या शंका आणि तक्रारींचं निराकरण करण्यासाठी निवडणूक आयोगानं राष्ट्रीय तसंच राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय हेल्पलाइन सक्रिय केल्या आहेत. राष्ट्रीय संपर्क केंद्र सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्रीय हेल्पलाइन म्हणून काम करेल. ते दररोज सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १८००-११-१९५० या टोल-फ्री क्रमांकाद्वारे कार्यरत राहणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

**सायबरसुरक्षा**

सायबर सुरक्षा क्षेत्रातले नवोन्मेषक धोका ओळखणे, सायबर न्यायवैद्यक आणि कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित नियंत्रक प्रणाली यासाठी आधुनिक पर्याय निर्माण करत आहेत असं भारतीय संगणक आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक डॉ. संजय बहल यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत युरोपिय देशांच्या वार्ताहरांशी बोलत होते. भारतातल्या सायबर सुरक्षा प्रणालीनं नवी उंची गाठली असल्याचं सांगून भारतातल्या सायबर सुरक्षा उद्योगाची आणि त्याच्या कार्यपद्धतीची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**पंतप्रधानगुजरात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. आज केवडिया इथल्या एकता नगरमध्ये विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन तप्रधानांच्या हस्ते केलं जाणार आहे.

**बिहारनिवडणूक**

बिहार विधानसभा निवडणुकीत सर्व राजकीय पक्षांच्या प्रचाराला आता वेग आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महाविकासआघाडीच्या पक्षांचे मुख्य प्रचारक आणि ज्येष्ठ नेते विविध ठिकाणी सभा घेत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज मुजफ्फरपूर आणि छपरा मध्ये निवडणूक प्रचारसभा घेणार आहेत. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव आज दहा ठिकाणी निवडणूक सभा घेणार आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात 121 विधानसभा मतदारसंघांत 6 नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**नीतीआयोगमहाराष्ट्र**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उत्पादन अभियानासोबतच महाराष्ट्र शासनही राज्य उत्पादन अभियान सुरू करेल, अशी घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. औद्योगिक उत्पादन क्षेत्रात भारताला जगात आघाडीवर नेण्याच्या दृष्टीनं नीती आयोगानं तयार केलेल्या दिशादर्शक आराखड्याचं प्रकाशन काल

पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्यात जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट' स्थापन करण्यात येईल, असंही त्यांनी घोषित केलं.

**इफ्फीनोंदणी**

५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठीची अर्थात इफ्फीसाठी माध्यम प्रतिनिधींची नांवनोंदणी सुरू झाली आहे. ५ नोव्हेंबरपर्यंत इच्छुकांना पीआयबीच्या संकेतस्थळावर नांवनोंदणी करता येईल. येत्या २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात पणजी इथं हा चित्रपट महोत्सव होणार आहे.
दरम्यान, १८ नोव्हेंबर रोजी भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफटीआयआयनं फक्त अधिकृत माध्यम प्रतिनिधींसाठी चित्रपट रसग्रहण कार्यशाळा आयोजित केली आहे.

**ब्राझीलअंमलीपदार्थ**

ब्राझीलमध्ये रिओ दी जेनेरिओ इथं पोलिसांनी अंमली पदार्थ तस्करांविरोधात केलेल्या कारवाईत आतापर्यंत १२१ जण ठार झाले आहेत. मृतांच्या वाढत्या संख्येबाबत संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस एँटोनिओ गुटेरस यांनी चिंता व्यक्त केली आहे.

कोमांडो व्हरमेलो ही रिओमधली सर्वात मोठी अंमली पदार्थ तस्करांची टोळी नष्ट करण्यासाठी ही कारवाई केल्याचं पोलिसांनी सांगितलं. या कारवाईत सुमारे अडीच हजार सुरक्षा कर्मचारी सहभागी झाले आहेत. मृतांमध्ये टोळीतल्या ११५ संशयित सदस्यांसह चार पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.
या कारवाईचा रिओमधल्या जनजीवनावरही परिणाम झाला आहे.
२०२४ मध्ये अशाच प्रकारच्या कारवाईत सुमारे सातशे लोक मारले गेले होते.

**फ्लोरिडाव्हिसा**

अमेरिकेतल्या फ्लोरिडा राज्यातल्या सर्व विद्यापीठांमधला एचवनबी व्हिसाचा वापर थांबवण्याचे आदेश देणार असल्याचं फ्लोरिडाचे गव्हर्नर रॉन डिसँटीस यांनी जाहीर केलं आहे. राज्यातल्या विद्यापीठांनी एचवनबी व्हिसाधारकांपेक्षा स्थानिक लोकांना रोजगार देण्यास प्राधान्य दिलं पाहिजे असं त्यांनी काल एका पत्रकार परिषदेत सांगितलं.

**माओशरण**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात काल ५९ माओवादी पोलिसांना शरण आले. राज्य सरकारच्या पुनर्वसन उपक्रमाला प्रतिसाद देत या माओवाद्यांनी मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला. या सर्वांवर मिळून ६६ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना काल पावसामुळे रद्द झाला.

दरम्यान, महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियाबरोबर होणार आहे. मात्र या सामन्यावरही पावसाचं सावट राहण्याची शक्यता आहे. उद्या अतिरिक्त राखीव दिवस निश्चित करण्यात आला असून या दिवशीही सामना होऊ शकला नाही तर ऑस्ट्रेलियाचा संघ अंतिम फेरीत पोहोचेल.

**<u>तेलंगणपाऊस</u>**

आंध्र प्रदेशात आलेल्या मोंथा चक्रीवादळानंतर तेलंगणच्या अनेक भागांत काल जोरदार पाऊस झाला. वारंगल, हनुमाकोण्डा, जंगाँ, महाबूबाबाद, करीमनगर, सिद्धिपेट आणि खम्मममधल्या  काही भागांमध्ये एक दिवसात २० सेंटीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. हनुमाकोण्डाच्या भीमादेवरपालेमध्ये सर्वाधिक ४२२ मिमी पावसाची नोंद झाली. हैदराबादमध्ये देखील दिवसभर पावसाची संततधार होती.

हवामान विभागांनं वारंगलसह ८ जिल्ह्यांसाठी अतिवृष्टीचा  तर १२ पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये पुराचा इशारा दिला आहे. राज्य सरकारने नागरिकांच्या बचाव आणि  मदतीसाठी राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती दलाचे जवान तैनात केले आहे. कोणार्क एक्सप्रेस, गोवळकोंडा एक्सप्रेस यांसारख्या अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**